आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 26.11.2026 **वार : गुरुवार**

ठळक बातम्या

1. 'संविधान दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन.
2. संविधान तरुणांच्या सामूहिक चेतनेचा एक अविभाज्य भाग बनला पाहिजे; पंतप्रधानांचं आवाहन.
3. 'बांधकाम आणि पायाभूत सुविधा उपकरण निर्मिती परिसंस्थेला चालना देणाऱ्या योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजूरी.
4. भारत, चीनसह 16 प्रमुख व्यापारी भागिदारांवर अतिरिक्त आयातशुल्क आकारण्याचा अमेरिकन प्रशासनाचा प्रस्ताव.
5. फिडे बुध्दीबळ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या डावात, गतविजेता डी. गुकेशचा खेळ बरोबरीत.

सविस्तर बातम्या

संविधान दिवस

'संविधान दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. यानिमित्त केंद्र सरकारची विविध मंत्रालये आणि विभाग, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांची सरकारे, तसेच स्वायत्त संस्था आणि विविध संस्थांकडून देशभर विविध उपक्रम राबवले जाणार आहेत. संसदीय कार्य मंत्रालयाने 'मायगव्ह' पोर्टलद्वारे भारतीय राज्यघटनेच्या उद्देशिकेचे 23 भाषांमध्ये ऑनलाइन पध्दतीने वाचन करण्याचा उपक्रम आयोजित केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नागरिकांना संविधानाची भावना जपण्याचे आणि 2047 पर्यंत विकसित भारत घडवण्यासाठी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन केलं आहे. संविधानाचा प्रभाव केवळ संसद आणि न्यायालयांपुरता मर्यादित न राहता, तो नागरिकांच्या विशेषतः तरुणांच्या सामूहिक चेतनेचा एक अविभाज्य भाग बनला पाहिजे असं त्यांनी वृत्तपत्रांसाठी लिहिलेल्या एका लेखात म्हटलं आहे. 26 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान सभेने भारतीय राज्यघटना स्वीकारली, त्या घटनेच्या स्मरणार्थ वर्ष 2015 पासून 'संविधान दिन' साजरा केला जात आहे.

मंत्रीमंडळ-मंजूरी

बांधकाम आणि पायाभूत सुविधा उपकरणांच्या निर्मिती करणाऱ्या परिसंस्थेला चालना देणारी योजना' केंद्रीय मंत्रिमंडळाने काल मंजूरी दिली. या योजनेसाठी एकंदर 11 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. बांधकाम आणि पायाभूत सुविधांसाठी लागणाऱ्या उपकरणांच्या देशांतर्गत उत्पादनाला प्रोत्साहन देणं हा या निर्णयाचा उद्देश आहे. यासह तामिळनाडूतील कामराजर बंदरावरील दुसऱ्या कंटेनर टर्मिनलचा विकास, आसाममधील सिलचर इथल्या 'डोलू' इथं 'ग्रीनफिल्ड विमानतळ' विकसित करण्यासही मंजुरी देण्यात आली आहे. 2026-27 ते 2030-31 या आर्थिक वर्षांसाठी टपाल कामकाज योजना सुरू ठेवण्यासही काल झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेचा उद्देश टपाल नेटवर्कचे

आधुनिकीकरण करणे, टपाल आणि पार्सल हाताळणी प्रक्रिया बळकट करणे, ग्रामीण भागातील संपर्क व्यवस्था सुधारणे आणि नागरिकाभिमुख सेवा अधिक सक्षम करणे हा आहे. यासोबतच, टपाल विभागासाठी मालमत्ता व्यवस्थापन योजना सुरू ठेवण्यासही मंजुरी देण्यात आली.

राष्ट्रीय गुंतवणूक धोरण

युरिया उत्पादनात आत्मनिर्भर भारत संकल्पनेला चालना देण्याच्या उद्देशानं केंद्र सरकारनं युरियासाठीच्या 'राष्ट्रीय गुंतवणूक धोरण-2026 अंतर्गत', ब्राउनफील्ड श्रेणीतील 6 नवीन युरिया प्रकल्पांना काल मंजुरी दिली. अशी माहिती रसायन आणि खते मंत्रालयानं काल दिली. कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढवणं, खतांची उपलब्धता सुनिश्चित करणं हा या निर्णयाचा उद्देश आहे. प्रत्येक ब्राउनफील्ड प्रकल्पात अंदाजे 9 हजार कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक केली जाणार आहे. यामध्ये तामिळनाडू, पंजाब, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि राजस्थानमधील सध्या कार्यरत असलेल्या प्रकल्पांचा समावेश आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने भारत आणि सिंगापूर यांच्यात विमान देखभाल, दुरुस्ती आणि ओव्हरहॉल क्षेत्रात कौशल्य आणि उद्योग विकासासाठी सहकार्य करण्याबाबतच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यास मंजुरी दिली आहे.

पंतप्रधान मोदी

रस्ते, वीज, कोळसा आणि रेल्वे क्षेत्रातील पाच महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांची वेळेवर अंमलबजावणी करताना बांधकामाच्या गुणवत्तेचे उच्च मापदंड पाळले गेले पाहिजेत. अशा सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्या. 'प्रगती'च्या 55व्या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. 'प्रगती' हे सक्रिय प्रशासन आणि वेळेवर अंमलबजावणीला चालना देण्याच्या उद्देशाने स्थापन झालेले एक बहुस्तरीय व्यासपीठ आहे. यावेळी एकंदर 78 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च असलेल्या प्रकल्पांचा त्यांनी आढावा घेतला.

राज्य-मंत्रीमंडळ निर्णय

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतल्या थेट लाभ हस्तांतरण योजनेत समाविष्ट नसलेल्या दारिद्र्य रेषेखालच्या 42 लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना पुढचे तीन महिने 5 किलो धान्य मोफत मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्रातल्या दुष्काळी परिस्थितीवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी यापुढे राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून बांधण्यात येणाऱ्या प्रत्येक नवीन पुलासोबत 'पूल वजा बंधारा' बांधणं बंधनकारक करण्यात आलं आहे. राज्याच्या दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही माहिती दिली. प्रत्येक पुलाखाली किमान एक मीटर लांबीची पाणी अडवणारी व्यवस्था उभारण्यात येणार आहे. पाणी साठवण क्षमता वाढवण्यासाठी राज्य शासनानं हा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

निवडणूक-आयोग

राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी सध्या सुरू असलेल्या 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण' प्रक्रियेदरम्यान, विद्यमान मतदार याद्यांमधील मतदारांच्या तपशिलांत असलेल्या चुका किंवा त्रुटी शोधून त्या दुरुस्त कराव्यात असे निर्देश निवडणूक आयोगानं काल दिले. मतदारांची नावं आणि जन्मतारीख यांसारख्या तपशिलांमधील त्रुटी शोधण्यासाठी आणि त्या दुरुस्त करण्यासाठी, संबंधित मतदारांच्या सध्याच्या नोंदींची तुलना 'विशेष सखोल पुनरीक्षण' दरम्यान मिळालेल्या माहितीशी करावी अशा सुचनाही देण्यात आल्या आहेत.

आयात शुल्क

अमेरिकेने चीन, युरोपियन युनियन आणि भारत यांच्यासह 16 देशांमधून होणाऱ्या आयातीवर 15 ते 35 टक्क्यांपर्यंत नवीन शुल्क लावण्याचा प्रस्ताव मांडला आहे. भारताने अमेरिकेबरोबर व्यापार करार केल्यास 17 टक्के शुल्क दर लागू करण्याबाबतही विचार केला जाऊ शकतो, असेही यात सुचवण्यात आले आहे. अमेरिकेचे व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर यांनी काल याबाबत माहिती दिली. अमेरिकन उत्पादकांचे नुकसान टाळण्यासाठी उपाय शोधणे या प्रस्तावाचा उद्देश आहे.

भारत-अमेरिका

भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करार लवकर पूर्ण करण्याच्या दिशेने अमेरिकेसोबत मिळून काम करण्यासाठी भारत सरकार कटिबद्ध आहे. असं वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे. भारत आणि अमेरिका यांच्यात द्विपक्षीय व्यापार कराराबाबत वाटाघाटी सुरू आहेत. व्यापाराशी संबंधित कोणतीही चिंता असल्यास, ती या वाटाघाटींच्या चौकटीतच सोडवली जावी. अशी भूमिका भारतानं मांडली आहे. अमेरिकन प्रशासनाने पुढील वर्षीच्या 5 जानेवारीपर्यंत प्रस्तावावर या देशांकडून सार्वजनिक मतं मागवली आहेत. हे प्रस्तावित शुल्क पुढील वर्षी फेब्रुवारी महिन्यापासूनच लागू होऊ शकते.

भारत-नेदरलँडस-बैठक

भारत आणि नेदरलँड्सदरम्यान सागरी सहकार्य अधिक दृढ करण्याच्या उद्देशानं काल हेग इथं द्विपक्षीय चर्चा झाली, अशी माहिती नेदरलँडसमधील भारतीय दूतावासानं समाजमाध्यमावरील संदेशांत दिली आहे. जलमार्ग मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री शांतनू ठाकूर आणि नेदरलँड्सचे जल व्यवस्थापन मंत्री व्हिन्सेंट कॅरेमन्स यांच्यादरम्यान ही बैठक झाली. यामध्ये बंदरांचे आधुनिकीकरण, स्मार्ट सागरी पायाभूत सुविधा, हरित जहाज मार्ग, शाश्वत इंधन, अंतर्गत जलमार्ग आणि जहाजबांधणी यांसारख्या क्षेत्रांवर विशेष भर देण्यात आला आहे. ठाकूर तीन दिवसांच्या दौऱ्यासाठी काल नेदरलँड्सला पोहोचले.

सेबी-केवायसी

भारतीय प्रतिभूति आणि विनिमय मंडळ अर्थात सेबीने केवायसी नोंदणी संस्थांमध्ये ग्राहक नोंदणी प्रक्रिया सुलभ करण्यासाठी आणि जोखीम व्यवस्थापन सुव्यवस्थित करण्यासाठी नवीन उपाययोजनांची घोषणा केली आहे. काल जारी केलेल्या परिपत्रकाद्वारे ही माहिती सेबीनं दिली. मध्यस्थांमधील पुनरावृत्ती टाळण्यासाठी, उत्पन्न श्रेणी, व्यवसाय, सीकेवायसी आयडी आणि डिजीपिन यांसारखे सामान्य ग्राहक तपशील आता केआरए स्तरावर केंद्रीकृत केले जातील. डेटा गोपनीयता अधिक बळकट करण्यासाठी, मध्यस्थांना आता खाते बंद केल्याची माहिती पाच कामकाजाच्या दिवसांच्या आत केआरए कडे देणं अनिवार्य असेल.

जागतिक बुध्दीबळ

फिडे बुध्दीबळ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या दुसऱ्या डावात, गतविजेता डी. गुकेश याने उझबेकिस्तानच्या जावोखिर सिंदारोव्हविरुद्ध 20 चालींनंतर सामना बरोबरीत सोडवला. 14 डावांच्या या अजिंक्यपद स्पर्धेत, दोन डावांनंतर दोन्ही खेळाडू प्रत्येकी एक गुणासह बरोबरीत आहेत. तिसरा डाव आज खेळला जाणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.